गुंठेवारी ५/१०/१५

# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

## नियमितीकरणाचा दाखला

गुंठेवारी विभाग № 007080
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,
नांदेड-४३१६०१
जा.क्र. 6984/13
दिनांक : 18-6-2013

महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम २००१ अन्वये प्रमाणित करण्यात येते की,

श्री / श्रीमती भास्करराव बापुराव पाटील खतगावकर आनंद नगर

यांनी श्री/श्रीमती एस. बी. चालीकवार

आर्किटेक्ट/इंजिनिअर/सर्व्हेअर यांच्याद्वारे गुंठेवारी नियमितीकरणाचा प्रस्ताव दाखल केला आहे. यांनी महाराष्ट्र शासन, सन २००१ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, नांदेड वाघाळा शहर म.न.पा. मुख्य सभा ठराव क्र. १२९ दि. २६/८/२००२ नुसार मान्य तरतुदी नुसार नांदेड वाघाळा शहर म.न.पा. हद्दीतील मौजे असदुल्लाबाद नं./सर्व्हे नं. 39 सि.स.नं. 10056 प्लॉट नं. 1 सोसायटी/कॉलनी मधील अनाधिकृत मोकळा भुखंड/~~भुखंडासह बांधकाम~~ नियमान्वित करण्यासाठी नांदेड वाघाळा शहर म. न. पा. कडे आ.क्र. 1109 दि. 18-12-12 नुसार अर्ज व विकसनाचे नकाशे दाखल करुन, अनाधिकृत मोकळा भुखंड/~~भुखंडासह बांधकाम~~ नियमीत करण्याची विनंती केली आहे.

अनधिकृत मोकळा भुखंड/~~भुखंडासह बांधकाम~~ महाराष्ट्र शासन सन २००१ या महाराष्ट्र अधिनियम क्र.-२७ अन्वये विवक्षित गुंठेवारी विकासाचे नियमितीकरण व श्रेणीवाढ करणे यासाठी आणि गुंठेवारी विकासाचे नियंत्रण करणेकरीता नांदेड वाघाळा शहर म.न.पा. मुख्य सभा ठराव क्र. १२९/दि. २६/०८/२००२ अन्वये सदरचा अनाधिकृत मोकळा भुखंड/~~भुखंडासह बांधकाम~~ अर्जदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे व त्यांनी दाखल केलेले हमीपत्र अर्जदारावर बंधनकारक ठेवून नियमित करणेत येत असून मंजूर नकाशासमवेत चिकटवलेल्या व या प्रमाणपत्राच्या पाठीमागे लिहीलेल्या अटीवर, नियमितीकरणाचा दाखला देण्यात येत आहे.

मान्यतेचे तपशील :

अ) नकाशामधील भुखंडाचे क्षेत्र 3629.20 (3596.20) चौ. मी.

ब) नकाशामधील बांधकाम क्षेत्र ________ चौ. मी.

अक्षरी क्षेत्र ________

टिप :

१) जागेच्या व इमारतीच्या मालकी हक्काचे बाबत अर्जदार यांनी उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रास अधीन राहून सदरचा दाखला देण्यात आलेला आहे.

२) नियमितीकरणाचा दाखला दिल्यानंतरचे काळात, अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जासोबतची कागदपत्रे व माहिती खोटी व चुकीची आढळल्यास व अर्जदार यांनी म.न.पा. ची दिशाभूल करुन व हमीपत्रातील अटींचे उल्लंघन करुन परवानगी घेतलेले सिध्द झाल्यास सदरचा नियमितीकरणाचा दाखला आपोआपच रद्द ठरविण्यात येईल व सदरचा भूखंड/भूखंडासह बांधकाम हे अनाधिकृत ठरवून अर्जदाराविरुध्द कारवाई करण्यात येईल.

३) मान्य करण्यात आलेला नकाशा सदरच्या दाखल्याचा एक भाग समजण्यात यावा.

४) यापुढील पत्रव्यवहार करतांना मान्य दाखला क्रमांक व दिनांक यांचा उल्लेख करावा.

५) भविष्यात विकास योजना रस्त्याने मिळकत बाधीत झाल्यास विना अट विना मोबदला बाधीत मिळकत म.न.पा. ताब्यात घेईल.

TRUE CO...

उप अभियंता,
गुंठेवारी विभाग, नां.वा.श.म.न.पा., नांदेड.

उपायुक्त
गुंठेवारी विभाग, नां.वा.श.म.न.पा., नांदेड.

# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

## गुंठेवारी कक्ष

### * अटी *

१) बांधकाम नियमान्वित करताना भविष्यात जर म.न.पा. रस्ता रुंदी वाढविणे आवश्यक वाटल्यास त्यासाठी सदर प्लॉटमधील लागणारी जागा विनातक्रार, विनामोबदला म.न.पा. च्या ताब्यात देणारे.

२) जर प्लॉटपर्यंत येणारा रस्ता कमी रुंदीचा असेल व त्यामुळे अग्निशामन यंत्रणा, ॲम्बुलन्स इत्यादी अत्यावश्यक सोई-सुविधा जागेपर्यंत पोहचू शकत नसतील तर, त्यामुळे होणाऱ्या गैरसोईबाबत भविष्यकाळात कोणतीही तक्रार करता येणार नाही.

३) या प्लॉटचा अधिकृत मोजणी दाखला जरी सादर केला नसला तरी प्लॉटची मापे, मालकी व वहिवाटा याबद्दल हमीपत्र दाखल केले असेल व अतिक्रमण झाले नसल्याची हमी घेतली असली तरी, अतिक्रमण केले असल्याचे भविष्यात सिध्द झाल्यास व त्यामुळे कायदेशीर वाद निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी बांधकाम धारकावर राहील व त्याबाबत कोणत्याही प्रकारची तोशीष नांदेड वा.श.म.न.पा.स लावता येणार नाही.

४) जर काही कारणाने इमारतीस धोका निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी बांधकाम धारकाची राहिल, त्यासाठी म.न.पा.स जबाबदार धरता येणार नाही.

५) हमीपत्रातील अटीचा भंग केल्याचे निर्दशनास आल्यास सदर बांधकाम दाखल अपात्र ठरवण्यात येईल.

६) भविष्याकाळात मालकी हक, हद्द, वहिवाट व चतु:सिमा इत्यादी बाबत कोणत्याही तक्रार आल्यास त्यास म.न.पा. जबाबदार राहणार नाही.

७) नागरी सोई सुविधा मिळण्यास काही कालावधी लागणार आहे. याबाबत कोणतीही तक्रार बांधकामधारकास नां.वा.श.म.न.पा. कडे करता येणार नाही.

८) नां.वा.श.म.न.पा. चा मिळकत कर वेळचे वेळी भरण्याची जबाबदारी बांधकाम धारकांची राहील.

९) नियमान्वित केलेल्या मिळकतीमधून, सार्वजनिक स्वरुपाच्या सुविधा उदा. रस्ता, वहिवाट, जलोत्सारण, पाणीपुरवठा, विद्युत इत्यादी प्रकारच्या सार्वजनिक सुविधा असल्यास त्यामधून इतर बांधकामधारकांना अथवा नां.वा.श.म.न.पा. स वाढीव जोड देणे, प्रवेश देणे अथवा त्यात सुधारणा करणे, या कार्यवाहीस हरकत घेता येणार नाही.

१०) नियमितकरण केलेल्या बांधकामानंतर वाढीव बांधकाम करावयाचे झाल्यास, त्याचे नियमानुसार नकाशे दाखल करुन पूर्वमान्यता घेतल्याशिवाय वाढीव बांधकाम करता येणार नाही. यासाठी बांधकामधारकाने नव्याने स्वतंत्र प्रस्ताव वाढीव बांधकामासाठी दाखल करणे आवश्यक आहे.

११) या नियमितीकरणाबाबत शासनाकडून वेळोवेळी जे निर्देश व बदल प्राप्त होतील ते सर्व अर्जदारावर बंधनकारक राहातील. त्याकामी शासनाच्या मागणीनुसार असणारे शासकीय शुल्क (एन.ए. टॅक्स, मोजणी शुल्क व मुद्रांक शुल्क इत्यादी) भरणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

१२) अर्जदाराने अर्जासोबत दाखल केलेली कागदपत्रे, माहिती खोटी व चुकीची असल्याचे भविष्याकाळात आढळल्यास नियमीतीकरणाचा दाखला रद्द ठरवण्यात येईल.

१३) भविष्यात विकास योजना (D.P.) रस्त्याने मिळकत बाधीत झाल्यास विनाअट विनामोबदला बाधीत मिळकत म.न.पा. ताब्यात घेईल.


BHAGYANAGAR TO ANAND NAGAR ROAD
BHAGYANAGAR TO ANAND NAGAR ROAD
ANAND NAGAR
SAHU NAGAR
VASANT NAGAR
LOCATION PLAN